**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५ )**

**मंगळवार दिनांक ७ जुलै २०२६**

**ठळक बातम्या....**

1. **वाहनचालक परवान्यासाठी १ ऑगस्टपासून महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य**

2. **तिसऱ्या ब्रिक्स परिवहन मंत्री कार्यगट परिषदेचं आयोजन येत्या ९ ते १२ जुलैदरम्यान नागपुरात होणार**

3. **राम मंदिर ट्रस्टच्या कथित गैरव्यवहाराबाबत CBI चौकशीची काँग्रेस प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत यांची मागणी**

**आणि**

4. **बाबा ताजुद्दीन यांचा शतकोत्तर चौथा वार्षिक उर्स उद्यापासून नागपुरात सुरू**

**आता सविस्तर बातम्या ......**

**वाहनचालक परवाना**

राज्यात वाहनचालक परवाना मिळविण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ पासून महाराष्ट्र अधिवास (डोमिसाइल) प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेत दिली. तसंच, अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांवर कारवाई सुरू असून प्रवाशांची सुरक्षितता, चालकांचं नियमन, महसूलवाढ आणि युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सर्वंकष धोरण राबविण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं. नव्या नियमांनुसार बाईक टॅक्सी चालकांची पोलीस पडताळणी, वैध परवाना आणि बॅज बंधनकारक करण्यात येणार असून वाहतूक नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.

ऐकूया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा आढावा आमच्या प्रतिनिधीकडून -

**विधी मंडळ**

***मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावर मिसिंग लिंकमध्ये निर्माण झालेल्या समस्येची कारणं सरकार शोधत आहे. ही कारणं सभागृहात मांडली जातील, असं निवेदन मंत्री शंभूराज***

*देसाई यांनी विधान परिषदेत दिलं. हे सरकार कोणालाही पाठीशी घालणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. निसर्गाच्या अवकृपेनं नेहमीपेक्षा चौपट पाऊस झाल्यानं ही समस्या निर्माण झाल्याचं ते म्हणाले. देहू आणि आळंदीहून निघणाऱ्या पालख्यांमधल्या वारकऱ्यांना पावसात सरकार काही मदत करणार का, यासंदर्भात निवेदन करण्याचे निर्देश सभापती राम शिंदे यांनी सरकारला दिले. अंबादास दानवे यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता.कर्नाटकसारख्या राज्यात जात पडताळणी करणं गरजेचं नाही. त्याचप्रमाणं महाराष्ट्रात सुधारणा करता येईल का याचा विचार करावा, त्यासाठी ॲडव्होकेट जनरलच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयात सुधारित अर्ज दाखल करावा, अशी मागणी सदस्य प्रसाद लाड यांनी केली. त्यावर कायदेशीर बाबी तपासून घेऊ, असं आश्वासन मंत्री माधुरी मिसाळ यांनी सदनात दिलं. नगरपालिका, नगरपरिषदांमध्ये नवनिर्वाचित सदस्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी आणखी ६ महिने मुदतवाढ देण्यासंदर्भातल्या विधेयकावरच्या चर्चेत त्या बोलत होत्या. सरकारनं आत्तापर्यंत सभागृहात दिलेली आश्वासनं आणि अधिक माहिती, पटलावर ठेवण्याच्या परिस्थितीबाबतची श्वेतपत्रिका हे अधिवेशन संपेपर्यंत काढावी, असा आदेश अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज दिला. १७ डिसेंबर २०१५ रोजीच्या उत्तरित प्रश्नाची अधिक माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्र्यांनी सभागृहासमोर मांडली. त्यावर सुधीर मुनगंटीवार यांनी आक्षेप घेतला. हा मुद्दा अतिशय गंभीर असल्याचं मत नार्वेकर यांनी नोंदवलं आणि अशा सर्व प्रलंबित बाबींचा अनुशेष पुढच्या अधिवेशनापर्यंत भरून काढावा, असंही त्यांनी सरकारला सांगितलं.*

*(आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी वीणा डोंगरवार)*

**पायाभूत सुविधांचे नूतनीकरण**

चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राच्या भटाडी खाणीतून कोळसा वाहतूक करणाऱ्या पाईप कन्व्हेअर बेल्टसह परिसरातील जुन्या पायाभूत सुविधांचं नूतनीकरण करण्यात येणार असून त्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. ५ मे रोजी कन्व्हेअर बेल्ट परिसरात लागलेली आग शेतातील अवशेष जाळल्यामुळे पसरल्याचं सांगत, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी जनजागृती आणि टप्प्याटप्प्यानं नूतनीकरणाची कामं हाती घेण्यात येतील, असं त्यांनी स्पष्ट केलं.

**स्वतंत्र सहसंचालक कार्यालय**

गोंडवाना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रासाठी गडचिरोली इथं स्वतंत्र सहसंचालक (उच्च शिक्षण) कार्यालय सुरू करण्याबाबत कार्यवाही सुरू असल्याची माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधान परिषदेत दिली. आमदार अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले आणि धीरज लिंगाडे यांनी ही मागणी उपस्थित केली होती. आकृतिबंध मंजूर करून वित्त विभागाची परवानगी घेतल्यानंतर कार्यालय सुरू करण्यात येणार असून, त्यामुळे चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांची नागपूरपर्यंतची पायपीट थांबण्यास मदत होणार आहे.

**ब्रिक्स नागपूर**

तिसऱ्या ब्रिक्स परिवहन मंत्री कार्यगट परिषदेचं आयोजन येत्या ९ ते १२ जुलैदरम्यान नागपुरात करण्यात आलं आहे. या परिषदेला ब्रिक्स सदस्य राष्ट्रांसह ११ देशांचे परिवहन मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार असून केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी ११ जुलै रोजी होणाऱ्या ब्रिक्स परिवहन मंत्र्यांच्या बैठकीचं अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. ही परिषद भारताच्या ब्रिक्स अध्यक्षतेच्या 'अनुकूलन, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वततेसाठी निर्माण ' या संकल्पनेअंतर्गत आयोजित करण्यात येत आहे. रशिया आणि ब्राझील यांनी आयोजित केलेल्या परिवहन कार्यगटाच्या पहिल्या दोन महत्त्वपूर्ण बैठकीनंतर होत असलेल्या या तिसऱ्या बैठकीचा उद्देश आंतरराष्ट्रीय परिवहन सहकार्याला अधिक बळकटी देणं हा आहे.या परिषदेच्या आयोजनाची तयारी अंतिम टप्प्यात असून सर्व यंत्रणा सज्ज असल्याची माहिती विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी दिली. परिषदेदरम्यान स्वागत, सुरक्षा, निवास, वैद्यकीय सुविधा आणि वाहतूक व्यवस्थेसह सर्व तयारी ठेवण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत.

**दीक्षाभूमी**

नागपूरचा दिवसेंदिवस विस्तार होत आहे. इथल्या औद्योगिक क्षेत्रासह पर्यटन क्षेत्रामध्ये देखील वृद्धी होत आहे. त्यामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या देश-विदेशातील अनुयायांचं शक्तिस्थळ असलेल्या दीक्षाभूमी विकासाचा आराखडा लवकरच सर्वसहमतीतून साकारू, असं आश्वासन महसूल मंत्री तथा पालकमंत्री

चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिलं. नागपूर सुधार प्रन्यास इथं आयोजित बैठकीत त्यांनी श्रीमहालक्ष्मी जगदंबा संस्थान तीर्थस्थळाचा विकास आणि विविध विकास प्रकल्पांचा आढावा घेतला. या बैठकीस नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीणा, महाव्यवस्थापक सचिन ढोले आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.दीक्षाभूमी परिसराचा विकास हा लोकप्रतिनिधी आणि समाज चिंतकांच्या सहयोगातूनच साकार व्हावा. लवकरच याबाबत एक विशेष बैठक बोलावण्यात येईल, असं बावनकुळे यांनी स्पष्ट केलं.नवीन नागपुरातील ले आऊट टाकण्याअगोदर पाणीपुरवठा आणि मलनिःसारणाला प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. नागपूर सुधार प्रन्यास आणि नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या अधिपत्याखाली असणा-या सर्व जागांची ड्रोनद्वारे आणि एमआरसॅक यंत्रणेचा वापर करून मॅपिंग करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.दरम्यान, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीनं पूर्ण करून एकही पात्र नुकसानग्रस्त मदतीपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही बावनकुळे यांनी दिली. एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या निकषांनुसार पात्र लाभार्थ्यांना २४ तासांत मदत देण्याची कार्यवाही सुरू असल्याचं त्यांनी नागपुरात पत्रकारांशी बोलताना सांगितलं.

## पीयूष गोयल

भारतातून जगातल्या अनेक देशात चामडं आणि चपलांची निर्यात साडेचार अब्ज डॉलर्सपर्यंत पोहचली आहे, अशी माहिती केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी दिली. नवी दिल्लीत काल चामडं निर्यात परिषदेत राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट निर्यात पुरस्कारांचं वितरण गोयल यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

## सुप्रिया श्रीनेत

अयोध्येतील राम मंदिर ट्रस्टच्या कथित कारभारावरून काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत यांनी नागपुरात पत्रकार परिषद घेऊन भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर गंभीर आरोप केले आहेत. राम मंदिर ट्रस्टमध्ये नालकोचे माजी सीएमडी बजरंगलाल बागरकर यांच्या नियुक्तीवर प्रश्न उपस्थित करत, त्यांच्यावरील कथित भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायमूर्तींच्या देखरेखीखाली सीबीआयमार्फत चौकशी व्हावी, अशी काँग्रेसची मागणी असल्याचं त्यांनी सांगितलं. तसंच, या प्रकरणावर पंतप्रधान

नरेंद्र मोदी यांनी मौन सोडून भूमिका स्पष्ट करावी, अशीही मागणी त्यांनी केली. राम मंदिरातील भ्रष्टाचाराचा विषय हा केवळ आर्थिक गैरव्यवहाराचा नसून कोट्यवधी हिंदूंच्या आस्थेशी संबंधित असल्याचा आरोप श्रीनेत यांनी केला.

**उर्स**

नागपूरच्या ताजबाग इथल्या सुफी संत हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन यांचा शतकोत्तर चौथा उर्स उद्या ८ जुलै ते १९ जुलै दरम्यान साजरा केला जाईल. उर्स दरम्यान देश-परदेशातून मोठ्या संख्येनं यात्रेकरू ताजबाग इथल्या दर्ग्याला भेट देतील. या पार्श्वभूमीवर महापौर निता ठाकरे यांनी मनपाकडून पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची पाहणी केली. उर्स दरम्यान स्वच्छता, पिण्याचं पाणी आणि अन्य नागरी सुविधा सुरळीत ठेवण्याचे तसंच आवश्यकतेनुसार अतिरिक्त स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचे निर्देश त्यांनी दिले. भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी मनपाच्या प्रवर्तन विभागानं दरगाह परिसरातील रस्त्यावरील अतिक्रमण हटवून मार्ग मोकळा केला आहे. उर्सचा आरंभ ८ जुलै रोजी सकाळी ९ वाजता रसम-ए-परचम कुशाईनं होईल. रात्री १० वाजता आंतरराष्ट्रीय सुफी परिषद आयोजित करण्यात आली आहे. उर्सनिमित्त धार्मिक, आध्यात्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. दर्ग्याच्या आवारात दररोज मिलाद शरीफ, व्याख्यानं, आंतरराष्ट्रीय कव्वाली, महफिल-ए-जिक्र, इत्यादी कार्यक्रम होणार आहे.राष्ट्राच्या सुरक्षेसाठी एक विशेष सामूहिक नमाज देखील आयोजित केली जाईल.

**गवताळ प्रदेश वाचवा**

अधिवास नष्ट होणं, बाभळीची झाडे कमी होणं आणि गवताळ प्रदेशाचा ऱ्हास यामुळे सुगरण पक्ष्यांच्या घरट्यांची संख्या झपाट्यानं घटत असल्याची चिंता बुलढाणा जिल्ह्यातील पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे. 'दुर्मिळ सुगरण पक्ष्यांची घरटी - बाभूळ आणि गवताळ प्रदेश वाचवा' या राज्यव्यापी मोहिमेला बुलढाणा जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत असून नागरिकांकडून गवत आणि बाभळीची लागवड केली जात आहे.

**पालखी**

'ज्ञानोबा-तुकोबा'च्या अखंड जयघोषात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि हजारो वारकऱ्यांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत जगद्‌गुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखीनं आज दुपारी आषाढी वारीसाठी देहूतून पंढरपूरकडं प्रस्थान केलं.  यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार छत्रपती संभाजीराजे, आमदार सुनील शेळके आणि महेश लांडगे यांनी पादुकांचं पूजन केलं.

**हवामान**

हवामान! येत्या काही तासात नागपूर जिल्ह्यात वादळी वारे आणि मेघगर्जनेसह तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे.

******